REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)  UGC APPROVED JOURNAL NO. 48514  ISSN: 2249-894X

VOLUME - 8 | ISSUE - 7 | APRIL - 2019

# वारसा हक्क कायदा जाणीव जागृतीविषयी शैक्षणिक कृतीकार्यक्रमाच्या परिणामकारकतेचा अभ्यास

प्रा. एकनाथ वाजगे
शिक्षणशास्त्र विभाग
श्री शिव छत्रपती महाविद्यालय, जुन्नर.(पुणे)




## प्रास्ताविक :—

स्त्री प्रश्नाचे स्वरुप काळानुसार बदलत गेले असले तरी मूळ समस्या संपलेली नाही. भारतात ब्रिटीश कालखंडात शिक्षणाच्या प्रचार प्रसारामुळे प्रबोधनाचे पर्व सुरु झाले. इंग्रजांनी भारतामध्ये टप्याटप्याने शिक्षण व्यवस्था रुजवली दृ मात्र सुरवातीच्या काळाात भारतीय प्रथा आणि परंपरामुळे महिलांच्या शिक्षणात मोठया प्रमाणात अडथळे निर्माण होत गेले. त्याला पर्याय म्हणून ब्रिटीश मिशनऱ्यांनी जनाना शिक्षण पद्धती राबवून सर्वप्रथम उच्च वर्गातील स्त्रियांना त्यांच्या आंतरमहालात गृहकृत्यांचे शिक्षण देण्याचे धोरण अवलंबिले. याच कालखंडात इंग्रजी शिक्षणव्यवस्थेतून उच्च शिक्षण घेतलेल्या मध्यमवर्गीयांना भारतातील स्त्री विषयक सुधारणांची गरज वाटली. भारतात वंचित घटक म्हणून राहिलेल्या स्त्रीला बालविवाह, भ्रूणहत्या सतीप्रथा विधवाविवाहावरील बंदी समाजामधील दुय्यम स्थान तसेच त्यांच्या विविध कारणासाठी होत असलेला छळ पाहून भारतीय समाज रानटी असंस्कृत अमानवी असल्याची टिका ब्रिटीश अधिकाऱ्यांकडून आणि विचारवंतांकडून होत गेली. यातून हा भारतीय संस्कृती आणि पुरुषार्थावरील हल्ला समजून भारतय विचारवंत आणि राष्ट्रवांद्यांकडून स्त्री सुधारणाविषयक पावले उचलली गेली. पुढे भारतीय समाजसुधारकांनी समाजसुधारणेच्या अग्रभागी महिलांच्या प्रश्नास ठेवले. यातून महिलांच्या शिक्षण विषयक हक्कासाठी महात्मा फुले , सावित्रीबाई फुले, महर्षी धोंडो केशव कर्वे, महर्षी वि. रा. शिंदे यांनी अमूलाग्र कार्य केले. . 1829 मध्ये लॉर्ड बेंटींगने सतीप्रथेविरुद्ध कायदा केला.या कायद्यानंतर भारतात सामाजिक सुधारणांच्या कायद्यास सुरुवात झाली. 1937 मध्ये हिंदू स्त्रीयांचा मालमत्ता हक्क कायदा संमत झााला. या कायद्यामुळे अपत्यहीन विधवा स्त्रीला पतीच्या संपत्तीत वारसा मिळाला.यामुळे प्रथमच विधवेला कायद्यादवारे हक्क मिळाला

प्राचीन कालखंडापासून महिलांना मालमत्तेच्या अधिकारापासून वंचित ठेवण्याची प्रथा जवळपास सर्वच मानव समूहामध्ये होती. प्राचीन मध्ययुगीन आणि आधुनिक भारतही त्यास अपवाद नव्हता. भारतीय महिलांना कायद्यादवारे संपत्तीत हक्क मिळण्याची प्रक्रीया फार मोठी आहे. अनेक शतकांच्या प्रवासानंतर टप्प्याटप्प्याने त्यांच्या संपत्तीच्या हक्कांमध्ये सुधारणा होत गेल्या. महिलांचे दुय्यम स्थान हे त्यांच्या उत्पन्नाच्या आणि संपत्तीच्या स्थितीवर आधारित असल्याने त्यांच्या सबलीकरणासाठी पित्याच्या आणि पतीच्या संपत्तीवरील तिचा हक्क आणि त्यासाठीचे कायदे हे तिच्या केवळ आर्थिकच नव्हे तर कौटुंबिक , सामाजिक, राजकीय या सर्वच परिस्थितीवर परिणाम करणारे ठरले. भारतात महिलांच्या हक्क रक्षणासाठी वेगवेगळया काळात कायदे निर्माण केले गेले. महिलांना अलिकडच्या काळात जे अनेक हक्क प्राप्त झाले त्यातील एक महत्वपूर्ण हक्क म्हणजे वारसा हक्क होय महिलांच्या दयनिय स्थितीचे कारण असणारी तिची परावलंबितता दूर करण्यासाठी हा कायदा उपयुक्त ठरला. 1956 पर्यंत महिलांना संपत्तीमध्ये शून्य अधिकार होता. 1956, 1994, आणि 2005 अशा चढत्या क्रमाणे मुलींच्या वारसा हक्काचा प्रवास झाालेला आहे. 2005 मध्ये वारसा हक्क कायद्यात महत्वपूर्ण बदल होउन महिलांना पित्याच्या संपत्तीत मुलांबरोबरच समान हिस्सा मिळेल अशी तरतुद केली त्यामुळे भारतीय महिलांना मालमत्तेचा महत्वपूर्ण अधिकार मिळाला.

महिलांना मिळालेले कायदेशीर संपत्तीविषयक हक्क वारसा हक्क यांचे समाजापर्यत प्रबोधन होणे गरजेचे आहे महिलांच्या सक्षमीकरणासाठी कायद्यातील अशा तरतुदी महिलांपर्यंत जाणे गरजेचे आहे. औपचारिक शिक्षणामध्ये याला मर्यादा येताना दिसून येतात आणि महिलांकडे पाहण्याच्या दृष्टीकोनामुळे अनौपचारिक शिक्षणातूनही त्या प्रसारीत होताना दिसून येत नाहीत. समाजजीननाच्या व वैवाहिक जीवनाच्या उंबरठयावर असणाऱ्या महाविद्यालयील तरुणींमध्येमध्ये वारसा हक्क विषयाची जाणीव निर्माण होण्यासाठी प्रस्तुत विषयावरील संशोधन उपयोगी ठरणार आहे.

## समस्या विधान

ग्रामिण भागातील महाविद्यालयीन विद्यार्थिनींसाठी वारसा हक्क कायदा जाणीव जागृती शिक्षण कृतिकार्यक्रमाची निर्मिती करुन त्याची परिणामकारकता अभ्यासणे.

## कार्यात्मक व्याख्या

### ग्रामिण भाग

राज्याचे लौकीक अर्थाने शहरी आणि ग्रामिण अशा दोन भागामध्ये विभाजन केले जाते. ज्या भागामध्ये लोकसंख्या विरळ असून भौतिक सोयी सुविधा कमी प्रमाणात उपलब्ध असतात अशा भागास ग्रामिण भाग म्हणतात.

### महाविद्यालयीन विद्यार्थिनी

ज्या शैक्षणिक संस्थेत पदवीचे शिक्षण दिले जाते अशा संस्थेस महाविद्यालय म्हणतात. महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थिनी म्हणजे महाविद्यालयीन विद्यार्थिनी.

### वारसा हक्क जाणीव जागृती कार्यक्रम

वारसा हक्क कायदा 2005 नुसार महिलांना पित्याच्या संपत्तीत समानतेने मिळालेला हक्काविषयी विद्यार्थिनींच्या माहिती संपादनात वाढ होण्यासाठी तयार केलेला कालबद्ध कार्यक्रम.

### परिणामकारकता

वारसा हक्क जाणीव जागृतीकार्यक्रमामुळे महाविद्यालयीन विद्यार्थिनींच्या वारसा हक्कविषयी संपादनात झालेली वाढ.

## संशोधनाची गरज आणि महत्त्व

१. महाविद्यालयीन विद्यार्थिनींमध्ये वारसा हक्क जाणीव जागृतीविषयक माहिती संपादनात वाढ होण्याच्या दृष्टीने प्रस्तुत संशोधन महत्वाचे आहे.
२. समाजामध्ये मालमत्ता आणि उत्पन्नाच्या साधनांच्या अभावी महिलांच्या स्थानामध्ये दुय्यमत्व आलेले दिसून येते. वारसा हक्कविषयक जाणीव जागृतीने तिच्या आत्मविश्वास वाढण्याच्या दृष्टीने प्रस्तुत संशोधन कार्य महत्वाचे आहे
३. महिलांना पतिच्या पित्याच्या आणि पुत्राच्या संपत्तीत देखिल हक्क असतो. हे हक्क डावलले गेल्यास विविध कायदे उपयोगी ठरतात अशा कायद्याविषयी विद्यार्थिनींना माहिती मिळण्याच्या दृष्टीने प्रस्तुत संशोधन गरजेचे आहे.

## संशोधनाची उद्दिष्टे

१. ग्रामिण भागातील महाविद्यालयीन विद्यार्थिनींमध्ये वारसा हक्क विषयी असलेल्या माहितीच्या सद्यस्थिचा अभ्यास करणे.
२. ग्रामिण भागातील महाविद्यालयीन विद्यार्थिनींसाठी वारसा हक्क जाणीव जागृती शिक्षण कृतिकार्यक्रम विकसित करणे .

३. ग्रामिण भागातील महाविद्यालयीन विद्यार्थिनींसाठी विकसित केलेल्या वारसा हक्क जाणीव जागृती शिक्षण कृतिकार्यक्रमाची परिणामकारकता अभ्यासणे.

## परिकल्पना

### संशोधन परिकल्पना

वारसा हक्क जाणीव जागृती शिक्षण कृतिकार्यक्रम राबविल्यामुळे ग्रामिण भागातील महाविद्यालयीन विद्यार्थिनींच्या वारसा हक्कविषयी माहिती संपादनात वाढ होईल.

### शून्य परिकल्पना

ग्रामिण भागातील महाविद्यालयीन विद्यार्थिनींसाठी राबविलेल्या वारसा हक्क जाणीव जागृती शिक्षण कृतिकार्यक्रमामुळे प्रायोगिक गटाच्या पूर्व आणि उत्तरचाचणीमधील संपादन गुणांच्या मध्यमानात सार्थ फरक पडणार नाही.

### संशोधनाची गृहीतके :–

१. समाजामध्ये महिलांच्या संपत्ती आणि वारसा विषयक हक्कांचे उल्लंघन होताना आढळते. (माहेश्वरी, अ 2011 )
२. महाविद्यालयीन स्तरावर विद्यार्थिनींना मानवी हक्कांचे शिक्षण देणे गरजेचे आहे. (राधामणी, अे. पी. 2015).

## संशोधनाची व्याप्ती मर्यादा व परिमर्यादा

### व्याप्ती

1. प्रस्तुत संशोधन हे जुन्नर तालुक्यातील कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनींशी संबंधित आहे.
2. प्रस्तुत संशोधन हे मानवी हक्कांशी संबंधित आहे.

### मर्यादा

१. प्रस्तुत संशोधनातील निष्कर्ष हे जुन्नर तालुक्यातील कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयातील विद्यार्थिनींकडून येणाऱ्या प्रतिसादावर अवलंबून आहे.
२. प्रस्तुत संशोधनामध्ये विद्यार्थिनींच्या कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक परिस्थितीवर संशोधकाचे नियंत्रण नाही.
३. प्रस्तुत संशोधन हे जुन्नर तालुक्यातील कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयातील मराठी माध्यमांच्या विद्यार्थिनींपुरते परिमर्यादीत आहे.
४. प्रस्तुत संशोधन श्री शिव छत्रपती महाविद्यालयातील कला शाखेच्या 62 विद्यार्थ्यांपुरते परिमर्यादित आहे.

## संशोधन पद्धती

प्रस्तुत संशोधनामध्ये संशोधकाने संशोधनासाठी बहु संशोधन पद्धतीचा अवलंब केला आहे. सर्वेक्षण पद्धती, साधन निर्मिती पद्धती आणि प्रायोगिक पद्धती या तीन पद्धतीचा अवलंब केला आहे.

**सारणी –मुख्य उदिदष्टांनुसार संशोधन पध्दती**

| उदिदष्ट क्र | संशोधन पद्धती | नमुना निवड पद्धती | माहिती संकलन साधने | महिती विश्लेषणाची साधने |
|---|---|---|---|---|
| 1 | सर्वेक्षण पद्धती | यादृच्छिक पद्धती | प्रश्नावली | शेकडेवारी |
| 2 | साधन निर्मिती पद्धती | | | |
| 3 | प्रायोगिक पद्धती | सहेतुक पद्धती | प्रश्नावली | मध्यमान, प्रमाणविचलन टी परिक्षिका |

**संशोधनाची चले.**

स्वाश्रयी चल :–वारसा हक्क जाणीव जागृती शिक्षण कृतिकार्यक्रम
आश्रयी चल :– विद्यार्थिनींची संपादणूक
नियंत्रित चल :– विद्यार्थिनींचा वयोगट , वेळ माध्यम
अनियंत्रित चल :– विद्यार्थिनींची सामाजिक आर्थिक कौटुंबिक परिस्थिती

**संशोधन अभिकल्प :–**

प्रस्तुत संशोधनासाठी एकलगट अभिकल्पाचा वापर संशोधकाने केला आहे.
एकलगट पूर्व चाचणी – उत्तरचाचणी अभिकल्प.

**संशोधनाची जनसंख्या :–**

प्रस्तुत संशोधनामध्ये जुन्नर तालुक्यातील कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयातील सर्व विद्यार्थिनींचा समावेश करण्यात आला आहे.

**न्यादर्श आणि न्यादर्श निवड पद्धती**

प्रस्तुत संशोधनामध्ये संशोधकाने सर्वेक्षणासाठी जुन्नर तालुक्यातील 6 कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयातील 265 विद्यार्थिनींची निवड यादृच्छिक पद्धतीने केली तसेच प्रायोगिक गटासाठी श्री शिव छत्रपती महाविद्यालय जुन्नर येथील कला शाखेतील 62 विद्यार्थिनींची निवड सहेतुक पद्धतीने केली आहे.

**माहिती संकलनाची साधने**

प्रस्तुत संशोधनामध्ये संशोधकाने उदिदष्ट क्र. 1 साठी वारसा हक्क विषयक सद्यस्थिती जाणून घेण्यासाठी संशोधक निर्मित प्रश्नावलीचा उपयोग केला. तसेच उदिदष्ट क्र. 3 साठी प्रायोगिक गटाच्या पूर्व व उत्तरचाचणीमध्ये संशोधक निर्मित प्रश्नावलीचा वापर केला आहे.

**माहिती विश्लेषणाची साधने**

सरासरी , मध्यमान , प्रमाण विचलन , टी परिक्षिका

**वारसा हक्क जाणीव जागृती शिक्षणकृतीकार्यक्रमाची निर्मिती आणि अंमलबजावणी :–**

संशोधकाने साधननिर्मिती पद्धतीच्या आधारे वारसा हक्क जाणीव जागृती शिक्षण कृतिकार्यक्रमाचा प्राथमिक आराखडा तयार केला. तयार केलेला कार्यक्रम मानवी हक्क विषयातील आणि शिक्षणशास्त्रातील तज्ञ व्यक्तींकडून तपासून घेतला. तज्ञांच्या सुचनांप्रमाणे कार्यक्रमांमध्ये योग्य ते बदल केले. वारसा हक्क जाणीव जागृती शिक्षण कृतिकार्यक्रातील ठरावीक घटकांच्या बाबतीत कार्यक्रमाचा पथदर्शी अभ्यास घेतला. पथदर्शी अभ्यासातील निष्कर्षाच्या आधारावर कृतिकार्यक्रमामध्ये योग्य ते बदल केले. कृतिकार्यक्रमाची अंतर्गत व बाहय सप्रमाणता विचारात घेउन अंतिम कार्यक्रमाची निर्मिती केली. सदर कृतिकार्यक्रम हा मानसशास्त्रीय तत्वांवर आधारित असून कार्यक्रमामध्ये व्याख्यान , गटचर्चा, अध्ययन साहित्य, बुद्धिमंथन यासारख्या विविध बाबींचा समावेश करण्यात आला आहे. वारसा हक्क जाणीव जागृती कृतिकार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यासाठी श्री शिव छत्रपती महाविद्यालय, जुन्नर या महाविद्यालयाची निवड केली. या महाविद्यालयातील 62 विद्यार्थ्यांच्या गटावर प्रायोगिक उपायांची अंमलबजावणी केली. एकूण 10 दिवसांच्या या कार्यक्रमामध्ये विविध उपक्रम विद्यार्थ्यासाठी राबविले,. कार्यक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीनंतर याच गटाची उत्तरचाचणी घेऊन पूर्व व उत्तर चाचणीतील गुणांची तुलना केली.

सारणी—वारसा हक्क संपादनाबाबत वर्णनात्मक संख्याशास्त्रीय माहिती.

| Discription | Pre-test | Post test |
|---|---|---|
| N | 62 | 62 |
| Mean | 6.35 | 11.41 |
| Standard Error of mean | 0.34 | 0.53 |
| Standard deviation | 2.69 | 4.21 |
| Skewness | .287 | -.276 |
| Kurtosis | .397 | -1.030 |

## पूर्व आणि उत्तर चाचणीसाठी संख्याशास्त्रीय विश्लेषण आणि अर्थनिर्वचन

1. पूर्व आणि उत्तरचाचणी ही 62 विद्यार्थिनींनी दिली.
2. पूर्व चाचणीचे मध्यमान हे 6.35 आहे तर उत्तरचाचणीतील मध्यमान 11.41 आहे.
3. पूर्व चाचणीचे प्रमाणविचलन 2.69 असून उत्तरचाचणीचे प्रमाणविचलन हे 4.21 आहे.

4. **विषमितता** :— वारसा हक्क विषयक संपादनाचे पूर्व चाचणीतील विषमितता मूल्य 0.287 असून ते धन आहे. म्हणजेच वितरण धन विषमित आहे. मध्यमान हे मध्यांक व बहुलकापेक्षा अधिक आहे. धन विषमित वितरणामुळे वक्र साधारणता डावीकडे झुकलेला आहे. अशावेळी वितरण हे प्रसामान्याच्या अगदी जवळ आहे असे म्हणता येते. त्याचबरोबर वारसा हक्कातील उत्तरचाचणीतील विषमितता मूल्य हे — 0.276 असून ते ऋण आहे. म्हणजेच उत्तरचाचणीतील वितरण ऋण विषमित आहे. मध्यमान हे मध्यांक आणि बहुलकापेक्षा कमी आहे. ऋण विषमित वितरणामुळे वक्र साधारणतः उजवीकडे झुकलेला आहे. अशावेळी वितरण हे प्रसामान्याच्या अगदी जवळ आहे असे म्हणता येते.

5. **शिखरदोष** :—वारसा हक्क या घटकाचे पूर्व चाचणीतील शिखरदोष मूल्य हे 0.397 असून ते धन आहे. हे मूल्य 0.263 पेक्षा अधिक आहे म्हणजेच वितरण साधारणतः चर्पटक शिखरी आहे. तर उत्तरचाचणीतील शिखरदोष मूल्य हे — 1.030 असून ते ऋण आहे. हे मूल्य 0.263 पेक्षा कमी आहे. म्हणजेच वितरण साधारणता उच्च शिखरी आहे. वितरण प्रसामान्याच्या अगदी जवळ आहे असे दिसून येते.

## परिकल्पनेचे परिक्षण

सारणी —वारसा हक्काबाबत टी परिक्षण

| चाचणी | नमुना | मध्यमान | प्रमाण विचलन | प्राप्त टी मूल्य | टेबल टी मूल्य | स्वाधिनता मात्रा | 0.01 स्तरावरिल सार्थकता |
|---|---|---|---|---|---|---|---|
| पूर्वचाचणी | 62 | 6.35 | 2.69 | 16.65 | 2.66 | 61 | सार्थ |
| उत्तरचाचणी | 62 | 11.41 | 4.21 | | | | |

## निरीक्षण आणि अर्थनिर्वचन

वरिल सारणीवरुन असे दिसून येते की, प्राप्त टी मूल्य 16.65आहे. स्वाधिनता मात्रा 61 करिता 0.01 सार्थकता स्तरावर सारणी टी मूल्य 2.66 आहे. प्राप्त टी मूल्य (16.65) हे साराणी टी मूल्यापेक्षा (2.66) अधिक असल्याने ते सार्थ आहे. म्हणून 0.01 स्तरावर शून्य परिकल्पनेचा त्याग करुन संशोधन परिकल्पनेचा स्वीकार केला.

यावरुन असे स्पष्ट होते की की, वारसा हक्क जाणीव जागृती शिक्षण कृतीकार्यक्रम राबविल्यामुळे ग्रामिण भागातील महाविद्यालयातीन विद्यार्थिनींच्या वारसा हक्कातील माहिती संपादन गुणांच्या मध्यमानामध्ये लक्षणिय वाढझाली. वारसा हक्क जाणीव जागृती शिक्षण कृतीकार्यक्रम परिणामकारक ठरला.



LBP PUBLICATION

## फलिते

1. नमुना गटातील विद्यार्थिनी स्वयंअध्ययन, साहित्य, गटचर्चा बुद्धिमंथन यासारख्या अध्ययन पद्धतीचा अवलंब करतात.
2. संशोधकाने विकसित केलेला वारसा हक्क जाणीव जागृती शिक्षण कृतीकार्यक्रम उत्कृष्ठ असल्याचे तज्ञांचे मत आहे.
3. वारसा हक्क जाणीव जागृती शिक्षण कृतीकार्यक्रम राबविला असता ग्रामिण भागातील महाविद्यालयातीन विद्यार्थिनींच्या वारसा हक्कातील माहिती संपादन गुणांच्या मध्यमानात वाढझाली. चाचणीतील प्राप्त टी मूल्य 16.65 असून ते सारणी टी मूल्यापेक्षा अधिक असल्यान 0.01 सार्थकता स्तरावर शून्य परिकल्पनेचा त्याग करुन संशोधन परिकल्पनेचा स्वीकार केला. वारसा हक्क जाणीव जागृती शिक्षण कृतीकार्यक्रम परिणामकारक ठरला.

## संदर्भ


1. Naik.V., & Sahni, M. (2011). ***Human Rights and Social Justice***. New Dehli; Crescent Publishing Corporation .
2. Saksena, A. (2004). ***Gender and Human Rights*: *Status of Women workers in India***. Dehli;Shipra publication.
3. Sharma, G. (1997). ***Human Rights and Social Justice***. New Delhi ; Deep and Deep publications.
4. चटर्जी, म. दा. (ऑगस्ट 2013). **महिलांचे राजकीय सबलीकरण सर्वसमावेशक लोकशाहीकडे नेणारा अश्वस्त मार्ग** (लेख) नवी मुंबई –योजना , प्रकाशन विभाग माहिती आणि प्रसारण मंत्रालय , भारत सरकार.
5. शर्मा, मं. (2009). **नारी के प्रति अत्याचार एवं मानवाधिकार**. जयपूर– मार्क पब्लिशर्स.
6. देहाडराय स्वा. आणि तांबे, अ. (2009). **स्त्रियांच्या चळवळी आणि संघटना**. पुणे : क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले स्त्री अभ्यास केंद्र.
7. देहाडराय स्वा. आणि तांबे, अ. (2009). **स्त्रिया कायदा आणि राजकारण** . पुणे : क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले स्त्री अभ्यास केंद्र.
8. रोडे, पु. (2009). **महिलांसाठी आधार कायद्याचा.** पुणे : डायमंड पब्लिकेशन.
9. गुजर, के.के. (2009). **हिंदू वारसा अधिनियम 1956.** जळगाव : चौधरी लॉ पब्लिशर्स.
10. https://www.humanrights.com
11. https://www.wikipedia.org
12. म्हस्के, टी. ए. (1991). **पैक्षणिक संख्याशास्त्र.** संगमनेर : प्रज्ञा प्रकाशन.





**प्रा. एकनाथ वाजगे**
**शिक्षणशास्त्र विभाग , श्री शिव छत्रपती महाविद्यालय, जुन्नर.(पुणे)**


LBP PUBLICATION